**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२५०**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २० सप्टेंबर, २०१६ रोजी झालेल्या २५०व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

७/१०/१६
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर<br>"प्रिया", वरळी सी फेस,<br>वरळी, मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री. एन्. व्ही. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २५०वी बैठक

**दिनांक :** **२० सप्टेंबर, २०१६ (मंगळवार)**

**वेळ :** **सकाळी ११.०० वाजता**

**स्थळ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण,**
**नविन प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, वांद्रे (पू.),**
**मुंबई – ४०० ०५१**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री.अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. सतिश गवई
प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग

श्री. व्ही. गिरिराज
प्रधान सचिव (व्यय),
(अपर मुख्य सचिव यांचे प्रतिनिधी),
वित्त विभाग

श्री. संजय खंदारे
अति.महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
सह-महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. प्र. द. ममदापुरे
प्रमुख,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अड्डुसुमिली
प्रमुख,
नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. संपतकुमार
प्रमुख,
नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती विजयालक्ष्मी
प्रमुख,
परिवहन व दळणवळण विभाग व
संचालक (प्रकल्प), मेट्रो (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. टी. ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह-प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

..३/-

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती तसेच इतर सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी झालेल्या २४९व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी झालेल्या २४९व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मेट्रो मार्ग-७ अंधेरी (पूर्व) – दहिसर (पूर्व) व मेट्रो मार्ग-२ब डि. एन. नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाच्या अंमलबजावणीकरीता साधारण सल्लागाराची (General Consultant) नियुक्ती करण्याबाबत.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की,प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून त्याची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे ₹ ३५,४०० कोटीस प्रशासकीय मान्यता मिळाली

आहे. त्यापैकी मेट्रो मार्ग ७ साठी अंदाजीत केलेल्या ₹ ४१८३ कोटी (सन २०१५ भावपातळी नुसार, करासहीत) मुळ किंमतीच्या खर्चास देखील सदर बैठकीत प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच मेट्रो मार्ग -२ ब (डी एन नगर – मंडाळे) या मार्गास प्राधिकरणाच्या दिनांक ३ जून, २०१६ रोजीच्या १३९ व्या बैठकीत अंदाजित किंमत ₹ ७२९७.१७ कोटी खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. या पैकी मेट्रो मार्ग ७ च्या कामाला निविदा मंजूर होऊन प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, वरील दोन्ही मेट्रो मार्गांकरिता साधारण सल्लागार (GC) नेमणूकीसाठी अंदाजपत्रके व मसुदा निविदा DMRC मार्फत तयार करुन घेतल्या होत्या. निविदापत्रकानुसार सल्लागारांकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. मेट्रो मार्ग ७ व २ब च्या स्थापत्य व संलग्न कामांची दैनंदिन देखरेख करणे ( या मध्ये Rolling Stock, Signaling आणि Telecommunication या कामांचा समावेश नाही.)
२. मेट्रो मार्ग ७ व २ब च्या डेपोच्या स्थापत्य कामाचे व प्रणाली कामांची (System Works) दैनंदिन देखरेख करणे
३. मेट्रो मार्ग ७ व २ब च्या कामांची चाचणी आणि प्रणाली सुरु करणे.
४. मेट्रो मार्ग ७ व २ब साठी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्त यांना वेळोवेळी प्रकल्पाविषयी माहिती देणे व परवानगी मिळविणे.

३.३ महानगर आयुक्त यांनी GC निविदा प्रक्रियेची माहिती देताना असे सांगितले की, टाईम्स ऑफ इंडीया वृत्त समूहामध्ये दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख १६ जून, २०१६ होती. दिनांक २१ जून, २०१६ रोजी लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले. एकूण तीन निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले. प्राप्त झालेले ई-निविदाकारांचे लिफाफे "अ" व "ब" DMRC ला मुल्यमापन करणेकरीता पाठवण्यात आले. प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक

छाननीसाठी DMRC द्वारा द्विस्तरीय मुल्यमापन समितीची स्थापना करण्यात आली, ज्यामध्ये मुख्य अभियंता व उप मुख्य अभियंता तसेच वित्त आणि करारनामा तज्ञ यांचा समावेश होता. DMRC यांनी त्यांचा तांत्रिक छाननी अहवाल प्राधिकरणास दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी सादर केला. अहवालानुसार निविदाकारांच्या प्राप्त गुणांचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त तांत्रिक गुण (७०००) |
|---|---|---|
| १ | Consortium of M/s AYESA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. M/s. ITALFERR S.p.A. M/s. Consulting Engineers Group Ltd., & M/s Ayesa India Private Limited | ६५२६.४४ (९३.२३ %) |
| २ | Consortium of M/s SYSTRA, M/s. RITES Limited, SYSTRA MVA Consulting (India) Pvt. Ltd., M/s. AARVEE Associates Architects Engineers And Consultants Pvt. Ltd | ६५९६.४३ (९४.२३ %) |
| ३ | Consortium of M/s DB Engineering & Consulting GmbH, M/s. Egis Rail, M/s. PADECO Company Limited, M/s. Hill International Inc | ६५७०.८० (९३.८७ %) |

३.४ विनंती प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे, ज्या निविदाकारांच्या तांत्रिक प्रस्तावाला ८०% वा त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात येतील. तांत्रिक निकषांनुसार तिन्ही निविदाकारांना ८०% पेक्षा जास्त गुण मिळाले असून तिन्ही निविदाकार तांत्रिकदृष्टया निविदेतील अटींप्रमाणे पात्र होतात.

३.५ महानगर आयुक्त यांनी निविदा शिफारस समितीची माहिती देताना सांगितले की, गठित केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये १) अतिरिक्त महानगर आयुक्त (१) २) संचालक (प्रकल्प) मेट्रो ३) वित्त सल्लागार ४) प्रमुख, नियोजन विभाग ५) मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका यांचा समावेश असून DMRC यांचा अहवाल समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने DMRC यांचा अहवाल मेट्रो अंमलबजावणी शाखेमार्फत

विनाक्रम तपासण्याचा सल्ला दिला. मेट्रो शाखेमार्फत अधिक्षक व कार्यकारी अभियंता पातळीवर तीन पथके गठीत करण्यात येऊन त्यांच्यामार्फत मुल्यमापन अहवाल निविदेतील अटींप्रमाणे विनाक्रम तपासण्यात आला व त्याबाबत निविदा शिफारस समितीस अवगत करण्यात आले. तद्नंतर निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अहवालास दिनांक २८ जुलै, २०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली व तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) उघडण्याची शिफारस केली. त्यानुसार तिन्ही पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडण्यात आलेल्या सर्व आर्थिक प्रस्तावांची छाननी DMRC मार्फत करण्यात आली. प्रस्तावित General Consultancy अंतर्गत महत्वाच्या तांत्रिक पदांसाठी आंतरराष्ट्रीय तज्ञांचा समावेश असणे निविदेतील अटीनुसार आवश्यक होते, यास्तव आर्थिक प्रस्ताव भारतीय चलन (रुपये) व विदेशी चलन (युरो/डॉलर/येन) या चलनांमध्ये मागविण्यात आले. प्राप्त वित्तीय प्रस्ताव (सेवा कर वगळता) खालीलप्रमाणे आहेत :-

| | |
|---|---|
| M/s.AYESA आणि समूह/संयुक्त उपक्रम | ₹ २१८,९८,८६,५५० + € ४५,५०,६२५ |
| M/s.SYSTRA आणि समूह/संयुक्त उपक्रम | ₹ २४६,२९,८५,७५० + € ७२,५६,८०० |
| M/s.DB Engg. आणि समूह/संयुक्त उपक्रम | ₹ २१०,२२,१२,६०८ + € ३२,९३,७५२ + $ ३७,४७,११२ |

३.६ प्राप्त वित्तीय प्रस्तावांचा तुलनात्मक अभ्यास करणेसाठी भारतीय रुपयात रुपांतर करण्यात आले आहे. त्यासाठी निविदा सादर तारखेच्या २८ दिवस आधीच्या म्हणजेच दिनांक १९ मे, २०१६ रोजीचे विनिमय दर (१ $ = ₹ ६८.०४ आणि १ € = ₹ ७६.७२) घेऊन प्राप्त आर्थिक प्रस्तावांचा रुपयात तपशील खालीलप्रमाणे :-

| | M/s AYESA आणि समूह/संयुक्त उपक्रम | M/s SYSTRA आणि समूह/संयुक्त उपक्रम | M/s DB Engg. आणि समूह/संयुक्त उपक्रम |
|---|---|---|---|
| रुपये घटक | ₹ २१८,९८,८६,५५०/- | ₹ २४६,२९,८५,७५०/- | ₹ २१०,२२,१२,६०८/- |
| युरो घटक | € ४५,५०,६२५ (=₹ ३४,९१,२३,९५०) | € ७२,५६,८०० (=₹ ५५,६७,४१,६९६) | € ३२,९३,७५२ (=₹ २५,२६,९६,६५३) |
| डॉलर घटक | --- | --- | $ ३७,४७,११२ (=₹ २५,४९,५३,५००) |
| एकूण | ₹ २५३,९०,१०,५०० | ₹ ३०१,९७,२७,४४६ | ₹ २६०,९८,६२,७६२ |

३.७ विनंती प्रस्तावास अनुसरुन तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव संयुक्त करताना तांत्रिक निकषाला ७०% भार आणि आर्थिक निकषाला ३०% भार देण्यात आले. त्याप्रमाणे प्राप्त संयुक्त गुण खालील तक्त्यात नमूद करण्यात आले आहेत :-

| अ.क्र | निविदाकाराचे नाव | तांत्रिक गुण (७०००) | आर्थिक गुण (३०००) | संयुक्त गुण (१००००) | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | M/s AYESA आणि समूह/संयुक्त उपक्रम | ६५२६.४४ | ३००० | **९५२६.४४** | **१** |
| २ | M/s SYSTRA आणि समूह/संयुक्त उपक्रम | ६५९६.४३ | २५२२.४२ | ९११८.८५ | ३ |
| ३ | M/s DB Engg. आणि समूह/संयुक्त उपक्रम | ६५७०.८० | २९१८.५६ | ९४८९.३६ | २ |

३.८ निविदेतील अटींनुसार तांत्रिक व वित्तीय निकषांत कमाल संयुक्त गुण संपादन करणाऱ्या सल्लागाराचा प्रस्ताव ग्राहय धरण्याची तरतूद आहे. त्यानुसार “M/s AYESA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह/संयुक्त उपक्रमास” कमाल संयुक्त गुण मिळाले असून यांचा “₹ २१८,९८,८६,५५० + € ४५,५०,६२५ + सेवा कर” एवढया किंमतीचा देकार आहे. निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा सुसंवादी व वाजवी असून DMRC यांनी पुढील मान्यतेसाठी अंतिम अहवाल प्राधिकरणास सादर केला. निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अंतिम अहवालास दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीत मान्यता दिली असुन त्याअनुषंगाने निविदा स्विकारण्यास शिफारस केली.

३.९ वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे.AYESA यांच्याकडे आवश्यक अनुभव आहे का अशी विचारणा केली, यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, मे. AYESA ही अनुभवी व विख्यात सल्लागार कंपनी असून त्यांनी दिल्ली मेट्रो व अन्य देशातील मेट्रो प्रकल्पांकरीता सल्लागार सेवा दिल्या आहेत.

३.१० मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी मे. AYESA यांचा देकार अंदाजपत्रकाच्या तुलनेत किती आहे याची माहिती विचारली, त्यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, अंदाजपत्रकीय खर्च ₹ २५१.१२ कोटी इतका असून प्राप्त देकार १.०९% जास्त आहे. तसेच हा देकार एकूण प्रकल्प किंमतीच्या सुमारे ३.६४% इतका आहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३०६ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे “M/s.AYESA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह / संयुक्त उपक्रमास” यांचा रु.२१८,९८,८६,५५० + €४५,५०,६२५ + सेवा कर एवढया किंमतीचा ई-निविदा देकार स्विकारण्यास व साधारण सल्लागार (GC) म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याव्दारे मान्यता देत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.४ :** **मेट्रो मार्ग – २ब डि.एन.नगर – मंडाळे या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य कामाकरीता निविदा प्रस्ताव तयार करणे, निविदा मागविणे आणि निविदा मूल्यमापन सहाय्याकरीता DMRC यांची अंतरिम सल्लागार (Interim Consultant) म्हणून नेमणूक करण्याबाबत.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु. ३५,४०० कोटीस (₹ ३०० कोटी प्रती कि.मी. प्रमाणे) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग -२ ब (डी एन नगर – मंडाळे) या मेट्रो मार्गास प्राधिकरणाच्या दिनांक २१ मार्च, २०१६ रोजीच्या १३९ व्या बैठकीत सविस्तर प्रकल्प अहवालास, अंमलबजावणीस आणि प्रकल्प पूर्णत्वाच्या किंमत रु. १०९७० कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळ मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव विचाराधीन आहे.

**४.३ मेट्रो मार्ग २-ब (डी. एन. नगर – मंडाळे) मार्ग अहवालाची ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे:-**

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | स्टॅन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| २ | मार्गाची लांबी | २३.६४३ कि.मी. (उन्नत) |
| ३ | एकूण स्थानके | २२(सर्व उन्नत) |
| ४ | गाडयांचे वेळापत्रक | वर्ष २०२१ – प्रति ६.० मिनिट<br>वर्ष २०३१ – प्रति ५.५ मिनिट |
| ५ | प्रस्तावित कार डेपो | मंडाळे (२२ हेक्टर) |
| ६ | इतर लागणारी जमीन (अंदाजित) कार डेपो वगळून | खाजगी – ३.४९३ हेक्टर<br>शासकीय – ५.१२४६ हेक्टर |
| ७ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | ऑक्टोबर २०१६ ते मार्च २०२० (४२ महिने) |
| ८ | तात्पुरती लागणारी जमीन (बांधकाम कालावधी दरम्यान) | ११.०० हेक्टर |
| ९ | मूळ किंमत (जमिनीची किंमत व कर वगळून) | रु. ५९८३ कोटी |
| १० | जमिनीची किंमत | रु. ९३५.४० कोटी |
| ११ | जमिनीवरील आकस्मिक खर्च (३%) | रु. २८.०६ कोटी |
| १२ | प्रकल्पाची मूळ किंमत | रु. ६९४७ कोटी |
| १३ | राज्य शासनाचा कर | रु. ७०९ कोटी |
| १४ | केंद्र शासनाचा कर | रु. १३१४ कोटी |
| १५ | प्रकल्पाची मूळ किंमत (केंद्र शासनाच्या करांसह) | रु. ८२६१ कोटी |
| १६ | पुनर्वसन व पुनर्वसाहत यांचा खर्च | रु. ९१.५९ कोटी |
| १७ | प्रकल्पाची मूळ किंमत (सर्व करांसहित) | रु. ९०६२ कोटी |
| १८ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (राज्य शासनाचा कर वगळून, ७.५% दरवाढ, २०१६ नुसार) | रु. १०२६१ कोटी |
| १९ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (सर्व करांसहित) | रु. १०९७० कोटी |

| | | |
|---|---|---|
| २० | EIRR (Economic Internal Rate of Return) | २५.२०% |
| २१ | FIRR (Financial Internal Rate of Return) with PD | १०.७८% |
| २२ | प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी) | ६ डब्यांची गाडी - १७५६<br>८ डब्यांची गाडी - २२४४ |
| २३ | प्रति ताशी प्रति दिशा प्रवासी संख्या (PHPDT) | वर्ष २०२१ – ३५,१४१<br>वर्ष २०२२ – ३८,५०९ |
| २४ | दैनंदिन प्रवासी संख्या | वर्ष २०२१-२२ – ८.९० लाख<br>वर्ष २०३१-३२ – १०.४९ लाख |

**४.४ सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर मेट्रो मार्गाचा अंदाजित भांडवली खर्च खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | तपशील | खर्च (रु. कोटीत) | कर (रु. कोटीत) | एकूण खर्च (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | मार्गिका बांधणे | ९०२.३६ | १८७.४१ | १०८९.७७ |
| २ | **स्थानकांचे बांधकाम** | | | |
| | अ) स्थापत्य काम | ७४८.०२ | १५५.३५ | ९०३.३७ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी काम | १७७.३६ | ४५.९६ | २२३.३२ |
| | क) ओ.सी.सी इमारत | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | ड) ओ.सी.सी. विद्युत व यांत्रिकी काम | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ३ | **कार आगार** | | | |
| | अ) स्थापत्य काम | ८०.०० | १७.८४ | ९७.८४ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी काम | १२०.०० | ३१.१० | १५१.१० |
| ४ | कायमस्वरुपी मार्ग | २३३.३२ | ६२.१४ | २९५.४६ |
| ५ | ट्रॅक्शन व विद्युत पुरवठा | २५६.६५ | ६७.१२ | ३२३.७७ |
| ६ | **संकेत व दूरसंचार यंत्रणा खर्च** | | | |
| | अ) संकेत | ३९०.९४ | १०७.२७ | ४९८.२१ |
| | ब) स्वयंचलित भाडे जमा खर्च | १२१.०० | ३३.३७ | १५४.३७ |
| ७ | **इतर खर्च (सेवावाहिन्या, रस्ता व बांधकाम, सुरक्षिततेचा खर्च, कर्मचारी इमारत, इंटिग्रेशन)** | | | |
| | अ) स्थापत्य कामे | २२९.०१ | ४७.५६ | २७६.५७ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी कामे | ७९.४३ | २०.४० | ९९.८३ |
| ८ | रेल्वे डब्यांचा खर्च | १९९९.२० | ५३१.१५ | २५३०.३५ |
| ९ | सुरक्षिततेचा खर्च | ८.८० | ०.०० | ८.८० |
| १० | कर्मचारी इमारत | ५३.२९ | ०.०० | ५३.२९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | बहूउद्देशीय एकात्मिकरण (Multimodel Integration) | ५०.८२ | ०.०० | ५०.८२ |
| १२ | **एकूण खर्च (जमिनीची किंमत वगळून)** | **५४२८.८८** | **१३१४.००** | ६७४२.८८ |
| १३ | आराखडयाच्या खर्चासहित सामान्य खर्च @ ७ % (जमिनीची किंमत वगळून) | ३८०.०२ | ०.०० | ३८०.०२ |
| १४ | **एकूण खर्च (अ.क्र. १२+१३)** | **५८०८.११** | **१३१४.००** | ७१२२.९० |
| १५ | आकस्मिक खर्च (३ % धरुन) | १७४.२७ | ०.०० | १७४.२७ |
| १६ | **एकूण खर्च (अ.क्र. १४+१५)** (जमिनीची किंमत वगळून) | **५९८३.१७** | **१३१४.००** | **७२९७.१७** |
| १७ | जमीन व **पुनर्वसन व पुनर्वसाहत** यांचा खर्च | १०२६.९९ | - | १०२६.९९ |
| १८ | जमिनीवरील आकस्मिक खर्च | २८.०६ | - | २८.०६ |
| १९ | **पूर्णत्वाची किंमत (राज्य शासनाचा कर वगळून)** | **१०,२६१.००** | | |
| २० | **पूर्णत्वाची किंमत (सर्व करांसहीत)** | **१०,९७०.००** | | |

४.५ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग ७ व २ब या प्रकल्पांकरीता साधारण सल्लागार (General Consultant) नियुक्त करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून "मे. AYESA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह" यांचे प्रस्ताव सर्वोत्तम असून कार्यकारी समितीची मान्यतेनंतर कार्यारंभ आदेश देण्याचे प्रस्तावित आहे. साधारण सल्लागारांच्या कामाच्या व्याप्तीमध्ये मेट्रो मार्ग - २ब करीता स्थापत्य कामाकरीता निविदा प्रस्ताव तयार करणे व निविदा प्रकिया व्यवस्थापन अंतर्भूत आहे, परंतु कार्यारंभ आदेश दिल्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु होण्याकरीता आणि मनुष्यबळ जमविण्याकरीता कमीत कमी १ ते २ महीने एवढा कालावधी लागेल यामुळे स्थापत्य कामाच्या निविदा प्रक्रियेस विलंब होईल. त्या अनुषंगाने जर DMRC चे मनुष्यबळ आधीच जागेवर उपलब्ध असल्यामुळे त्यांना मेट्रो मार्ग - ७ प्रमाणे मेट्रो मार्ग - २ब करीता अंतरिम सल्लागार म्हणून नेमणूक केली तर १ ते २ महीने कालावधीची बचत होऊन स्थापत्य कामाची निविदा प्रक्रिया लवकर सुरु होईल.

४.६ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, याबाबत DMRC यांचेकडून मेट्रो मार्ग — २ब करीता स्थापत्य कामासाठी निविदा प्रस्ताव तयार करणे, निविदा मागविणे, निविदा मूल्यमापन सहाय्याकरीता अंतरिम सल्लागार म्हणून काम करण्याकरीता विनंती करण्यात आली ज्याकरीता

DMRC यांनी रु ३.२१ + सेवा कर कोटी एवढी फी मागितलेली आहे, त्याअनुषंगाने साधारण सल्लागार "मे. AYESA INGENIERIA Y ARQUITECTURA S.A.U. आणि समूह" यांचे कडून सदर कामाची व्याप्ती कमी करुन त्याच्या सल्लागार फी मधून रु. ३.२१ कोटी + सेवा कर किंमत कमी करण्याबाबत संमती / ना-हरकत घेतली आहे.

४.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदरची फीची टक्केवारी बद्दल विचारणा केल्यावर महानगर आयुक्त यांनी माहीती दिली की, स्थापत्य कामाकरीता या व्याप्तीची किंमत ०.०८% इतकी आहे.

४.८ महानगर आयुक्त यांनी अशी माहीती दिली की, साधारण सल्लागाराच्या प्रत्यक्ष कामास सुरु होण्यास लागणाऱ्या १ ते २ महीने विलंब लक्षात घेता, मेट्रो २ब प्रकल्पांचे निविदा प्रस्ताव तयार करणे, निविदा मागविणे, निविदा मूल्यमापन सहाय्याकरीता मेट्रो मार्ग ७ प्रमाणे DMRC यांची एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून रु. ३.२१ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्याचे प्रस्तावितआहे.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३०७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे मेट्रो-२ब प्रकल्पांचे निविदा प्रस्ताव तयार करणे, निविदा मागविणे, निविदा मूल्यमापन सहाय्याकरीता DMRC यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून रु.३.२१ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यास तसेच या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याव्दारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रस्तावित साधारण सल्लागार (GC) मधून DMRC ला अंतरिम सल्लागार (IC) काम करण्याकरीता देण्यात येणाऱ्या रु.३.२१ कोटी + सेवा कर वगळण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मेट्रो मार्ग – ४ वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली या मेट्रो मार्गाकरीता दिल्ली मेट्रो रेल महामंडळाची (DMRC) यांची अंतरिम सल्लागार (Interim Consultant) म्हणून नेमणूक करण्याबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ बैठकीत तसेच दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुंबई मेट्रो मार्गांची पुढील ३ ते ४ वर्षात ११८ कि.मी. लांबीच्या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्यास मान्यता मिळाली असून या उन्नत मेट्रो मार्गांची त्वरित अंमलबजावणी करण्याकरीता अंदाजे रु. ३५,४०० कोटीस (₹ ३०० कोटी प्रती कि.मी. प्रमाणे) प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेट्रो मार्ग -४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या मेट्रो मार्गास प्राधिकरणाच्या दिनांक ०३ जून, २०१६ रोजीच्या १४० व्या बैठकीत अंदाजित किंमत रु. १४,५४९ कोटी खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**५.३ मेट्रो मार्ग ४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) अहवालाची ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे:-**

| अ. क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | स्टॅन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| २ | मार्गाची लांबी | ३२.३२ कि.मी. |
| ३ | एकूण स्थानके | ३२ |
| ४ | प्रति ताशी प्रति दिशा प्रवासी संख्या (PHPDT) | वर्ष २०२१ – २८,१०७<br>वर्ष २०२२ – ३३,४१७ |
| ५ | दैनंदिन प्रवासी संख्या | वर्ष २०२१-२२ – ८.९० लाख<br>वर्ष २०३१-३२ – १२.१३ लाख |

| | | |
|---|---|---|
| ६ | गाडयांचे वेळापत्रक | वर्ष २०२१ – प्रति ३.७५ मिनिट<br>वर्ष २०३१ – प्रति ३.०० मिनिट |
| ७ | प्रस्तावित कार डेपो | ओवळे (३० हेक्टर) खाजगी |
| ८ | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | एप्रिल २०१७ ते जुलै २०२१ (५२ महिने) |
| ९ | मूळ किंमत<br>(जमिनीची किंमत व कर वगळून) | रु. ७,८४५ कोटी |
| १० | जमिनीची किंमत | रु. १,३०७.४ कोटी |
| ११ | आकस्मित खर्च (३%) | रु. २२८.५० कोटी |
| १३ | राज्य शासनाचा कर (मूळ) | रु. ६३० कोटी |
| १४ | केंद्र शासनाचा कर (मूळ) | रु. १,२९३ कोटी |
| १५ | प्रकल्पाची मूळ किंमत<br>(जमीन व केंद्र शासनाच्या करांसह) | रु. १०,४८५ कोटी |
| १६ | पुर्नवसन व पुर्नवसाहत यांचा खर्च | रु. १२५.२१ कोटी |
| १७ | प्रकल्पाची मूळ किंमत<br>(सर्व करांसहित) | रु. ११,११५ कोटी |
| १८ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत<br>(सर्व कर, दरवाढ आणि बांधकाम दरम्यानचे व्याज (IDC) इ. सह) | रु. १४,५४९ कोटी |
| १९ | EIRR (Economic Internal Rate of Return) | २२.७९% |
| २० | FIRR (Financial Internal Rate of Return) with PD | ८.२२% |
| २२ | प्रवासी क्षमता<br>(६ डब्यांची गाडी) | ६ प्रवासी प्रति वर्ग मिटर प्रमाणे - १७५६ प्रवासी क्षमता<br>८ प्रवासी प्रति वर्ग मिटर प्रमाणे - २२४४ प्रवासी क्षमता |

**५.४ सविस्तर प्रकल्प अहवालानुसार सदर मेट्रो मार्गाचा अंदाजित भांडवली खर्च खालील प्रमाणे :-**

| अ. क्र. | तपशील | खर्च (रु. कोटीत) | कर (रु. कोटीत) | एकूण खर्च (रु. कोटीत) |
|---|---|---|---|---|
| १ | मार्गिका बांधणे | १३२१.१५ | ३२३.९३ | १६४५.०८ |
| २ | **स्थानकांचे बांधकाम** | | | |
| | आ)स्थापत्य काम पॅसेंजर स्क्रिनिंग डोअर (PSD) सह | १११४.३९ | २८०.४८ | १३९४.८७ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी काम | २६६.५७ | ७९.०८ | ३४५.६५ |
| | ख) ओ.सी.सी इमारत | ५५.०० | १३.४९ | ६८.४९ |
| | ड) ओ.सी.सी. विद्युत व यांत्रिकी काम | २५.०० | ७.४२ | ३२.४२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | **कार आगार** | | | |
| | अ) स्थापत्य काम | १००.०० | २६.०५ | १२६.०५ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी काम | १५०.०० | ४४.५० | १९४.५ |
| ४ | **कायमस्वरुपी मार्ग (P-Way)** | ३१९.८१ | ९७.१७ | ४१६.९८ |
| ५ | **ट्रॅक्शन व विद्युत पुरवठा** | | | |
| | ट्रॅक्शन व विद्युत पुरवठा | ३४९.८८ | ९९.३८ | ४४९.२६ |
| ६ | **संकेत व दूरसंचार यंत्रणा खर्च** | | | |
| | अ) संकेत | ५३२.९५ | १५८.२३ | ६९१.१८ |
| | ब) स्वयंचलित भाडे जमा खर्च | १८१.८७ | ५४.२५ | २३६.१२ |
| ७ | **पुनर्वसन व पुनर्वसाहत यांचा खर्च** | १२५.२१ | १०.३३ | १३५.५४ |
| ८ | **इतर खर्च (सेवा वाहिन्या, रस्ता व बांधकाम, सुरक्षिततेचा खर्च, कर्मचारी इमारत, बहूउद्देशीय एकात्मीकरण) (Multimodle Intergration)** | | | |
| | अ) स्थापत्य कामे | ३४१.५२ | ८३.७४ | ४२५.२६ |
| | ब) विद्युत व यांत्रिकी कामे | ११८.२० | ३४.७८ | १५२.९८ |
| ९ | **रेल्वे डब्यांचा खर्च** | २११६.८० | ६१०.०२ | २७२६.८२ |
| १० | **एकूण खर्च (जमिनीची किंमत वगळून)** | **७११८.३५** | **१९२२.८३** | **९०४१.१८** |
| ११ | आराखडयाच्या खर्चासहित सामान्य खर्च @ ७ % (जमिनीची किंमत वगळून) | ४९८.२८ | ००.०० | ४९८.२८ |
| १२ | **एकूण खर्च (अ.क्र. १०+११)** | **७६१६.६३** | **१९२२.८३** | **९५३९.४६** |
| १३ | आकस्मिक खर्च (३ % धरुन) | २२८.५० | ००.०० | २२८.५० |
| १४ | **एकूण खर्च (अ.क्र. १२+१३)** (जमिनीची किंमत वगळून) | **७८४५.१३** | **१९२२.८३** | **९७६७.९६** |
| १५ | जमीन व पुर्नवसन व पुर्नवसाहत यांचा खर्च | १३०७.४ | ०.०० | १३०७.४ |
| १६ | जमीनीवरील आकस्मिक खर्च | ३९.२२ | ०.०० | ३९.२२ |
| १७ | **प्रकल्पाची मूळ किंमत (जमीन व जमिनीवरील आकस्मिक खर्चासह)** | **९१९१.७३** | **१९२२.८३** | **१११११४.५६** |
| १८ | **प्रकल्पाची किंमत (जमीन व सर्व करासहीत)** | **११,११५/-** | | |
| १९ | **प्रकल्प पूर्णत्वाची किंमत (सर्व कर, दरवाढ आणि बांधकाम दरम्यानचे व्याज रु. ४७.०० कोटी (IDC) इत्यादी सह)** | **१४,५४९/-** | | |
| २० | **प्रकल्प पुर्णत्वाची किंमत (राज्य शासनाचा कर, जमिनीची किंमत व बांधकाम दरम्यानचे व्याज वगळून)** | **११,७२६/-** | | |

५.५ महानगर आयुक्त यांनी विषद केले की, प्रस्तावित मेट्रो मार्गाकरीता निविदा प्रस्ताव डिसेंबर पर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाकरीता ठरविलेल्या वेळापत्रकानुसार साधारण सल्लागार (General Consultant) नियुक्त करण्याकरीता तीन महिने कालावधी अपेक्षित असल्याने दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा अनुभव पाहता तसेच भारत सरकार आणि दिल्ली सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने मेट्रो मार्ग -४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या मेट्रो मार्गाकरीता दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीच्या रु. ११,७२६ कोटीच्या ०.१२५% म्हणजेच रु. १४.६५७५ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पास लागणाऱ्या स्थापत्य कामाकरीता अंदाजपत्रक तयार करणे, निविदा तयार करणे, निविदा मागविण्यास मदत करणे, निविदा पडताळणी करण्यास मदत करणे, सर्व टप्पा (packages) प्रणाली एकत्रिकरण करण्याबाबत समन्वय साधणे, तसेच साधारण सल्लागार नेमणूकीस अंदाजपत्रक तयार करणे, निविदा प्रक्रियेत मदत करणे, इत्यादी कामे अंतरिम सल्लागाराच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट आहेत.

५.६ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा अनुभव पाहता तसेच भारत सरकार आणि दिल्ली सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने मेट्रो मार्ग -४ (वडाळा-घाटकोपर- मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या मेट्रो मार्गाकरीता अंतरिम सल्लागार म्हणून बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे स्थापत्य कामासाठी तसेच साधारण सल्लागार निविदा प्रक्रिया पूर्ण करणे कामी DMRC यांची अंतरिम सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याकरिता प्रकल्प किंमतीच्या रु. ११,७२६ कोटीच्या ०.१२५ % म्हणजेच रु. १४.६५७५ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यास मान्यता द्यावी.

५.७ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की, सदर कामाच्या व्याप्ती करीता ०.१२५% एवढी फी आहे का? यावर महानगर आयुक्त यांनी माहीती दिली की, मेट्रो मार्ग -७ प्रमाणे प्रकल्प किंमतीच्या ०.१२५% + सेवा कर इतक्या किमतींवर अंतरीम सल्लागार म्हणून फी आकारण्यात येत आहे.

५.८ महानगर आयुक्त यांनी माहीती दिली की, मेट्रो मार्ग - ४ हा एक स्वतंत्र मेट्रो मार्ग असल्याने दिल्ली मेट्रो रेल महामंडळ ह्या प्रकल्पाकरीता एकमेव स्त्रोत अंतरीम सल्लागार म्हणून ह्याच मार्गाकरिता काम करतील .

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३०८ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा अनुभव पाहता तसेच भारत सरकार आणि दिल्ली सरकार यांचा संयुक्त उपक्रम असल्याने मेट्रो मार्ग-४ (वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली) या मेट्रो मार्गाकरीता दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांना एकमेव स्त्रोत तत्वावर अंतरिम सल्लागार म्हणून प्रस्तावित व्याप्तीसाठी प्रकल्प किंमतीच्या रु.११,७२६ कोटीच्या ०.१२५% म्हणजेच रु.१४.६५७५ कोटी + सेवा कर इतक्या किंमतीवर नेमणूक करण्यास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास कार्यकारी समिती याव्दारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ :** **कलानगर जंक्शन येथील उड्डाणपुलांच्या प्रस्तावित बांधकामाच्या लघुत्तम ई-निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाविषयी माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, कलानगर जंक्शनवर विशेषत: सकाळी व संध्याकाळी वाहतुकीची प्रचंड कोंडी होताना आढळते. वांद्रे-कुर्ला

..१८/-

संकुल हे एक आंतरराष्ट्रीय वित्तीय व व्यापार केंद्र असून त्याच्या उन्नतीकरीता व उपरोक्त बाबी विचारात घेता वांद्रे-कुर्ला संकुलातील परिवहन व्यवस्था सुसाध्य होणे अत्यावश्यक आहे. याकरीता सद्यस्थितीतील वाहतुकीचा सर्व्हे करणे, उड्डाणपुल / भुयारी मार्ग इ. योजनेव्दारे वाहतूकीची कोंडी होऊ नये अशा उपाययोजना अभ्यास करणेकरीता, प्रकल्प सुसाध्यता अहवाल व सर्वंकष प्रकल्प आराखडा बनविण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्यात आली होती. मे.स्टुप कन्सलटंट प्रा. लि. या सल्लागाराने केलेल्या सर्वंकष प्रकल्प आराखडयातील विविध पर्यायांची व्यवहार्यता तपासून कलानगर जंक्शन येथे वाहतुक व्यवस्थेची रचना पुढीलप्रमाणे प्रस्तावित आहे :-

अ. वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा प्रथम स्तरीय उड्डाणपूल.

ब. वांद्रे-कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा व्दितीय स्तरीय उड्डाणपूल.

क. सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुलाकडे जाणारा प्रथम स्तरीय उड्डाणपूल.

ड. धारावी ते पश्चिम द्रुतगती महामार्गाकडे जाणारा व्दितीय स्तरीय उड्डाणपूल.

इ. धारावीकडून सी-लिंककडे जाणारा स्टिल्ट (Stilt) वर आधारीत वळण रस्ता.

उपरोक्त चारही प्रस्तावित उड्डाणपूलांचा, रस्त्याच्या व अनुषंगिक बाबींच्या बांधकामांची एकूण अंदाजित रक्कम रु. २२७ कोटी इतकी असून सदर किंमतीस प्राधिकरणाने दिनांक २०.११.२०१४ रोजी झालेल्या १३६ व्या बैठकीत ठराव क्र. १३३० अन्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर बैठकीत प्रस्तावित उड्डाणपूलांचे तसेच एकूण वाहतुक व्यवस्थेचे सविस्तरपणे सादरीकरण करण्यात आले.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्रथम टप्प्यात वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंककडे जाणारा उड्डाणपूल, सी-लिंक ते वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येणारा उड्डाणपूल व धारावीकडून सी-लिंककडे जाणारा स्टिल्ट (Stilt) वळण रस्ता ही कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. पश्चिम महामार्गावरील कामातील अडचणी जसे की, उड्डाणपुलाच्या आराखडयात येणारा मोठा नाला व इतर उड्डाणपूलांचे बांधकाम सुरु असताना पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून वांद्रे कुर्ला संकुल ते पश्चिम द्रुतगती महामार्ग व त्यास धारावी कडून येऊन व्दितीय स्तरावर जोडणारा हे दोन उड्डाणपूल दुस-या टप्प्यात घेण्याचे प्रयोजन आहे. कलानगर जंक्शन येथील प्रचंड वाहतुकीची वर्दळ व इतर तांत्रिक बाबी विचारात घेता तांत्रिक

सल्लागार समितीने ३० महिन्यांचा बांधकाम कालावधी निश्चित केला. निविदा अर्हता निकष सुध्दा समितीने सुचविल्याप्रमाणे निश्चित करण्यात आले. सदर प्रस्तावित दोन्ही उड्डाणपूलांची व वळण रस्त्याची अंदाजित रक्कम रु.१५३.७० कोटी इतकी आहे. पहिल्या टप्प्यातील उड्डाणपूलांच्या बांधकामास्तव इच्छुक ठेकेदाराकडून ठोक रक्कमेवर (Lump Sum) स्वत:चे संकल्पचित्र बांधकामावर (Design build) आधारीत दिनांक ०२.१२.२०१५ रोजी जाहीर ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यास प्रतिसाद देऊन खालील सहा निविदाकारांनी स्वारस्य दाखविले :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव |
|---|---|
| १. | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लिमिटेड |
| २. | मे. जेएमसी प्रोजेक्टस् (इंडिया) लिमिटेड |
| ३. | मे. एन.सी.सी. लिमिटेड |
| ४. | मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लिमिटेड |
| ५. | मे. सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड |
| ६. | मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लिमिटेड |

सहा प्राप्त निविदांची पूर्व निश्चित अर्हता निकषानुसार छाननी करण्यात आली. छाननी दरम्यान सर्व निविदांमध्ये काही तांत्रिक त्रुटी आढळल्या. सबब सर्व निविदाकारांस तांत्रिक त्रुटी कळविण्यात आल्या. काही निविदाकारांनी निविदा अटी व शर्तीनुसार अनुपालन केले. तथापि, मे. सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर इंडिया लिमिटेड यांनी आर्थिक पूर्व अर्हता निकष पूर्ण केले नसल्यामुळे तसेच मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस् लिमिटेड हे तांत्रिक पूर्व अर्हता निकष पूर्ण करत नसल्यामुळे त्यांच्या संकल्पचित्राची छाननी करण्यात आली नाही. चारही पात्र निविदाकारांचे आर्थिक लिफाफे दिनांक १८.०५.२०१६ रोजी उघडण्यात आले. आर्थिक देकारांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

अंदाजित रक्कम : रु. १५३.७० कोटी

| अ. क्र. | निविदाकाराचे नाव | देकाराची रक्कम (रु. कोटीत) | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस् लिमिटेड | रु. १७९.७५ | (+) १६.९४% | तृतीय लघुत्तम |
| २. | मे. जेएमसी प्रोजेक्टस् (इंडिया) लिमिटेड | रु. १८५.९७ | (+) २०.९९% | चतुर्थ लघुत्तम |
| ३. | मे. एन.सी.सी. लिमिटेड | रु. १७८.१८ | (+) १५.९२% | व्दितीय लघुत्तम |
| ४. | मे. सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड | रु. १६३.०८ | (+) ६.१०% | प्रथम लघुत्तम |

..२०/-

६.३ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, उड्डाणपूलाखालील काही भूभाग तटीय किनारा नियंत्रणामध्ये येत असून बांधकामावर त्याच्या काय परिणाम होईल ? यावर माहिती देतांना प्रमुख, अभियांत्रिकी विभाग यांनी असे सांगितले की, धारावी कडून सि-लिंककडे जाणा-या वळण रस्त्यामध्ये १६ तिवरांची झाडे बाधीत होत असून त्यांच्या पुर्नलागवडीसाठी प्रस्ताव वन विभागाकडे पाठविण्यात आला आहे. त्यास मंजूरी मिळाल्यानंतर मुंबई हायकोर्टाची परवानगी मिळविण्यात येईल. यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेवून कंत्राटात वळण रस्त्याच्या बांधकामासाठीची जागा कंत्राटदारास वर्षभरात देण्याची तरतूद करण्यात आली आहे. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की कार्यरंभ आदेशात त्याचा उल्लेख करण्यात यावा.

**निर्णय :** **चर्चेअंती, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३०९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभुत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे, कलानगर जंक्शन येथे वांद्रे-कुर्ला संकुल ते सी-लिंकच्या दिशेने जाणारा व सी-लिंकच्या दिशेकडून वांद्रे-कुर्ला संकुलाकडे येणारा प्रस्तावित उड्डाणपूल व धारावीकडून सी-लिंककडे शासकीय जमिनीवरुन जाणारा वळण रस्ता या कामांच्या बांधकामाकरीता मे.सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांची लघुत्तम निविदा रक्कम रु.१६३,०८,००,०००/- (रु.एकशे त्रेसष्ठ कोटी आठ लाख मात्र) अधिक निविदेनुसार देय भाववाढ स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह तसेच तिवरांच्या तोडणीसाठी लागणाऱ्या वेळेची जाणीव व जबाबदारी कंत्राटदारावर सोपवून अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.७ :** **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी अत्याधुनिक पध्दतीची कार्यालयीन इमारत व निवासी इमारत बांधणे.**
**- मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास व अतिरिक्त बाबी तसेच इमारतीसाठी आवश्यक असलेल्या फर्निचर, विद्युतीकरण, उदवाहने व वातानुकुलीत यंत्रणा इ. सेवाविषयक एकत्रित कामांसाठी प्राधिकरणाकडून सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शिफारस करणेबाबत.**

७.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी बाब टिपणीची क्रमशः सविस्तर माहिती समितीस दिली. महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, सदर प्रस्तावातील मूळ स्थापत्य कामांच्या मंजुर निविदा रक्कमेत (रु. ४८.९१ कोटी) झालेल्या वाढीव व्याप्तींमुळे रु. ७८.७४ कोटी इतक्या सुधारित अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव बाब टिपणी कार्यकारी समितीच्या दिनांक १०.०७.२०१२ रोजी झालेल्या २३४ व्या बैठकीत ठेवण्यात आली होती. त्यावर कार्यकारी समितीने वाढीव खर्चास तसेच अतिरिक्त बाबीस मंजूरी देण्यापूर्वी या सर्व बाबी कशाप्रकारे उद्भवल्या व इमारत पूर्ण करण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरेल? या सर्व बाबी तपासण्याकरीता कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य, श्री. ना.वि. मेराणी यांची एक सदस्यीय समितीची नियुक्ती केली. त्या अनुषंगाने मेराणी समितीने प्रकल्पाची पाहणी केली तसेच कार्यालयीन दस्ताऐवजावरुन वाढीव व अतिरिक्त बाबी कशा उदभवल्या यांची सविस्तर तपासणी केली.

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मेराणी समितीने सुचविल्याप्रमाणे मूळ निविदेतील वाढीव व्याप्ती व्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या इतर कामांबाबत (बाहय दर्शनी कामे, अंतर्गत स्थापत्य कामे, उदवाहनांची कामे, विद्युत, वातानूकुलित यंत्रणा व अंतर्गत सजावटींची कामे इ.) एकत्रितपणे कार्यान्वयनाची कार्यवाही पूर्ण करुन कार्यालयीन इमारतीची एकूण किंमत रु. ११५.५४ कोटी (निविदा अटी व शर्तीनुसार देय असणा-या भाववाढीसह) इतकी असून निवासी इमारतीची किंमत रु. १७.६५ कोटी इतकी आहे. त्याप्रमाणे दोन्ही इमारतीची एकूण किंमत रु. १३३.२० कोटी इतकी आहे. निवासी इमारतीचे बांधकाम माहे मे, २०१० मध्ये पूर्ण झाले असून कार्यालयीन इमारतीचे काम माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण झाले असून इमारतीचा प्रत्यक्षपणे वापर माहे जानेवारी, २०१६ पासून सुरु झालेला आहे.

..२२/-

७.३ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाच्या वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांच्याबाबत माहिती देताना सांगितले की, सल्लागाराचे मूळ शुल्क रु. ७०.३२ लाख (म्हणजेच ०.९% वास्तुविशारद पोटी व ०.९% प्रकल्प सल्लागारापोटी) इतके होते. मेराणी समितीने त्यांचे अहवालात सल्लागाराचे शुल्क मूळ निविदा किंमतीच्या आधारावरच सिमीत करावे असे सूचविले होते. परंतु सुरुवातीस निवासी इमारतीच्या संपूर्ण बांधकामाकरीता व कार्यालयीन इमारतीचा केवळ सांगाडा उभारणीच्या कामाकरीता निविदा मागवून प्रत्यक्ष बांधकाम माहे मार्च, २००८ मध्ये सुरु करण्यात आले. कार्यालयीन इमारतीकरीता लागणा-या इतर बाबींसाठी म्हणजे बाहय दर्शनी भागाचे काम, अंतर्गत स्थापत्य व उदवाहनाचे काम, अंतर्गत सजावटीचे काम, विदयुतीकरणाचे काम, वातानुकूलित यंत्रणेसंबंधीचे काम इ. कामे टप्याटप्याने सक्षम प्राधिका-याची मंजूरी घेऊन निविदा मागविण्यात आल्या. याकरीता बराच कालावधी लागला. तसेच वरील सर्व बाबींची व्याप्ती सल्लागारास वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार या नात्याने पूर्ण करण्याचे त्यांच्या कंत्राटात नमूद होते. त्याबरोबरच इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याची जबाबदारी सल्लागाराचीच होती. सबब सल्लागाराच्या मूळ शुल्कात कामांच्या मूळ निविदांच्या किंमतीत वाढ झाल्यामुळे तसेच कंत्राटातील तरतूदीनुसार सल्लागारास वाढीव कालावधीकरीता देय असलेल्या वाढीमुळे सल्लागाराच्या शुल्कात वाढ झालेली आहे. यास्तव, श्री. तांबे, माजी सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची एक सदस्यीय समिती नेमण्यात आली. समितीने सल्लागारास नेमून दिलेल्या कामांचा व प्रकल्पाच्या कामांचा वाव यांचा सविस्तरपणे अभ्यास केला. समितीने वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांचे मूळ शुल्क व प्रकल्पाच्या वाढीव व्याप्तीमुळे प्रकल्प सल्लागारास प्रतीमाह शुल्क देण्याबाबतची शिफारस अहवालानुसार केलेली आहे. सदर अहवालानुसार सल्लागारास माहे डिसेंबर, २०१५ अखेरपर्यंत रु. ५.११ कोटी इतके शुल्क अदा करण्यात आलेले आहे. तांबे समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार प्रकल्प सल्लागारास माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत एकूण रु. ५.६९ कोटी इतके शुल्क अदा करावे लागेल. परंतु सल्लागाराने माहे मार्च, २०१६ अखेरपर्यंत एकूण रु. ११.८८ कोटी इतके शुल्क मिळणेबाबत मागणी केलेली आहे असे समितीच्या निदर्शनास महानगर आयुक्तांनी आणले. तसेच कार्यकारी समितीने निर्देशित केल्याप्रमाणे प्रकल्पाच्या संरचनेत करावे लागलेले बदल हे प्रकल्प सल्लागाराच्या कामातील उणिवांमुळे आहेत किंवा कसे? याबाबत तांबे समितीचा अंतिम

अहवाल अपेक्षित आहे. अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीच्या शिफारशीनुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

७.४ त्यावर मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, सल्लागाराची निवड ही स्पर्धात्मक निविदा मागवून प्राप्त करण्यात आली किंवा कसे ? त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर सल्लागाराची निवड ही स्पर्धात्मक निविदा मागवून प्राप्त झालेले आहे.

७.५ श्री. द.म. सुकथनकर, सदस्य कार्यकारी समिती यांनी सांगितले की, मेराणी समितीने सल्लागाराचे शुल्क हे मुळ निविदा किंमतीवरच अदा करावे अशी शिफारस केलेली असली तरी, प्रकल्पाची वाढीव व्याप्ती व कालावधी यांची वाढ लक्षात घेता जरी प्रकल्प सल्लागाराने रु. ११.८८ कोटी शुल्क मिळणेबाबत मागणी केलेली असली तरी तांबे समितीने शिफारस केल्याप्रमाणे रु. ५.६९ कोटी पेक्षा जास्त शुल्क अदा करु नये.

७.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मेराणी समितीच्या अहवालात सूचविल्याप्रमाणे मूळ निविदेतील वाढीव व अतिरिक्त बाबींचे दर व परिमाणे हे अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व अधिक्षक अभियंता, मुं.म.प्र.वि.प्रा. यांच्या तांत्रिक समितीमार्फत तपासणी करण्यात आली. सदर अहवालातील शिफारशीनुसार ठेकेदारास कार्यान्वयन झालेल्या कामांचे देयक अदा करण्यात आलेले आहे. परंतु तांत्रिक समितीने शिफारस केल्यानुसार काही बाबींचे दर मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि. या मूळ इमारत बांधकामाच्या ठेकेदारास मान्य नसल्याने रु. २.६५ कोटी इतक्या अंदाजित रक्कमेची तरतूद निविदा अटी व शर्तीनुसार अन्य समितीच्या शिफारशीस अधिन राहून अदा करण्याचे प्रस्तावित आहे. त्याप्रमाणे प्रकल्पाची संपूर्ण सुधारित किंमत रु. १४१.५३ कोटी इतकी आहे. सदर सुधारित किंमतीपैकी मूळ निविदेच्या वाढीव किंमतीस (रु. ७५.३० कोटी) मान्यता तसेच कार्यालयीन इमारत पूर्ण करण्याकरीता कराव्या लागलेल्या इतर ४ कामांसाठीचा एकूण सुधारित खर्च रु. ५७.८९ कोटी व प्रकल्प सल्लागाराचे शुल्क रु. ५.६९ कोटी अशा एकूण रु. १३८.८८ कोटी इतक्या किंमतीस कार्योत्तर सुधारित प्रशासकिय मान्यता प्राधिकरणाकडून घेण्यास कार्यकारी समिती समोर सदर बाब ठेवण्यात आलेली आहे.

७.७ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीने २३४ व्या बैठकीत निर्देशित केल्याप्रमाणे कामाच्या वाढीव किंमती संदर्भात त्यावेळची प्रकल्पाची स्थिती व पूर्ण झालेल्या कामांची पाहणी केली तसेच दोन ते तीन बैठका घेवून कार्यालयीन दस्ताऐवजांची बाबी कशा उदभवल्या यांची तपासणी केली. श्री. ना. वि. मेराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी सुरुवातीपासून घडलेल्या प्रकल्पातील घडामोडींचा सर्व सारांश समितीसमोर मांडला.

७.८ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी कार्यकारी समितीच्या निदर्शनास आणले की, कार्यालयीन इमारतीच्या मूळ संकल्पनेत कराव्या लागणा-या आमुलाग्र बदलांमूळे मूळ निविदेत वाढीव व अतिरिक्त बाबी उदभवणार असल्याने अभियांत्रिकी विभागाने मूळ निविदेतील एकूण बाबींपैकी निवासी इमारत पूर्ण करुन कार्यालयीन इमारतीबाबतची मुळ बाब वगळून फक्त कार्यालयीन इमारतीसाठी सुधारित संकल्पनेवर आधारित अंदाजपत्रक तयार करुन नव्याने स्पर्धात्मक निविदा काढावी असे प्रस्तावित केले होते, जेणेकरुन मूळ निविदेअंतर्गत वाढीव व अतिरिक्त बाबींचे कार्यान्वयन करणे टळेल. सदर प्रस्ताव प्रशासकीय स्तरावर मान्य करण्यात आला नाही. त्यावर कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी विचारणा केली की, अभियांत्रिकी विभागाने नव्याने स्पर्धात्मक निविदा काढावी असा प्रस्ताव सादर करतेवेळी कार्यालयीन इमारतीच्या कामाची स्थिती काय होती ? त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, पायाभरणीसाठी लागणा-या सुमारे ४०० पाईल्स पैकी ८० पाईल्सचे कार्यान्वयन पूर्ण झालेले होते. यासंदर्भात पुढे श्री. ना. वि. मेराणी यांनी सांगितले की, त्यांनी त्यांच्या अहवालात सूचविल्याप्रमाणे सर्व तांत्रिक मुद्यांचे अनुपालन पूर्ण झाले असून सदर तांत्रिक मुद्यांचा अंतिम कार्यवाही अहवाल बाब टिपणी सोबत जोडण्यात आलेला आहे. तथापि, सदर अहवालातील मुद्या क्र. १.२ मधील वस्तुस्थिती विचारात घेता पुढील कार्यवाही होणे क्रमप्राप्त आहे असे वाटते.

७.९ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली की मेराणी समितीचा अहवाल या बाब टिपणीसोबत जोडण्यात आलेला नाही. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मेराणी समितीचा अहवाल हा कार्यकारी समितीच्या २३५ व्या बैठकित ठेवण्यात आला होता. तसेच सदर अहवालाच्या शिफारशीबाबत सविस्तर चर्चासुध्दा झाली होती.

७.१० चर्चेअंती, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी निर्देशित केले की, मेराणी समितीचा अहवाल सिलबंद पाकिटात कार्यकारी समितीच्या सर्व सदस्य/निमंत्रित यांना माहितीसाठी पाठवून त्यावर त्यांचे मत घ्यावे व सदर बाब पुढील कार्यकारी समितीच्या बैठकित अंतिम निर्णयासाठी फेरसादर करावी.

**बाब क्र.८ :** **<u>श्री.उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक चौकशी अधिकाऱ्याने सादर केलेला चौकशी अहवाल मान्यतेकरीता सादर.</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री. उमेश लुकतुके तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यास कार्यकारी समितीने दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी झालेल्या २४४व्या बैठकीत ठराव क्र.१२७९ अन्वये मंजूरी देण्यात आली असून श्री. व्ही. डब्ल्यू. देशपांडे, माजी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र शासन यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास व श्री. पी. एम. यादव, वरिष्ठ नियोजक, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिलेली होती.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणातील विभाग प्रमुखांच्या नेमणूकीचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत. तसेच त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचे अधिकारसुध्दा कार्यकारी समितीस असल्याने श्री. व्ही. डब्ल्यू. देशपांडे, चौकशी अधिकारी यांनी श्री. उमेश लुकतुके तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांची चौकशी करण्यात येऊन चौकशी अहवाल दिनांक ३१.०३.२०१६ रोजी सादर केला आहे.

८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, कार्यकारी समितीने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार चौकशी अहवालाच्या व आरोपांच्या Extract च्या प्रती सर्व सदस्य/निमंत्रित यांना पाठविण्यात आल्या.

८.४ तद्नंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी श्री. उमेश लुकतुके यांच्यावरील कठोरतम विकास नियंत्रण नियमावली लागू करणे, बांधकाम परवानगीतील अटी व शर्ती तपासून न पहाणे, पी. व्ही. देशमुख यांच्या पत्रास 'CRZ Clearance' समजणे व

premiumच्या रक्कमेस महानगर आयुक्तांची मान्यता न घेणे या चार आरोपांवरील चौकशी अहवालावर सदस्यांची मते विचारली. विकास नियंत्रण नियमावली लागू करणेबाबत कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले की, विकास नियंत्रण नियमावली, १९६७ मध्ये जिना, उदवाहने व त्यासमोरील मोकळया जागेची चटई क्षेत्र निर्देशांकात गणना करणे आवश्यक आहे. यावर असे कळविण्यात आले की, सदर प्रस्तावास, लागू चटई क्षेत्र निर्देशांकाच्या अनुषंगाने, कठोरतम नियमावली लावली व तद्नंतर शासनाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार विकास नियंत्रण नियमावली लागू केली आहे. याबाबत कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य श्री. द. म. सुकथनकर यांनी असे सांगितले की, उपलब्ध नियमावलींपैकी कठोरतम नियमावली लागू करणे ही एक रुढ पद्धत आहे. बांधकाम परवानगीतील अटी व शर्ती तपासून न पाहिल्याबाबत कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, प्रारंभ प्रमाणपत्रातील अटी व शर्ती पुढील परवानगीपर्यंत शिथिल करणे ही देखिल रुढ पद्धत आहे. श्री. पी. व्ही. देशमुख यांचे दिनांक १५.०३.२००४ रोजीचे पत्र 'CRZ Clearance' समजण्याबाबत श्री. नितीन करीर यांनी असे सांगितले की, त्या काळी CRZ ना- हरकत प्रमाणपत्र हे नगर विकास विभागामार्फत दिले जात होते. तसेच विकसनातील 'पोडियम' या प्रस्तावित बांधकामासंदर्भात आकारावयाच्या premium च्या रक्कमेस महानगर आयुक्तांची मान्यता घेतली नसल्यासंदर्भात अशी चर्चा झाली की, प्रारुप विकास नियंत्रण नियमावली, १९८९ तसेच विकास नियंत्रण नियमावली १९९१ अन्वये आवश्यक मोकळया जागांच्या तरतुदीमध्ये तफावत येत नसल्याने premium आकारण्याचा प्रश्न येत नाही व तसे तत्कालीन महानगर आयुक्तांच्या निर्दशनास आणले होते.

८.५ तसेच श्री. नितीन करीर यांनी असेही सांगितले की, चौकशी अधिकारी श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे हे नगररचना व मूल्यनिर्धारण विभागाचे पूर्वसंचालक आहेत. तसेच त्यांनी मंत्रालयात देखिल कार्य केले आहे. या क्षेत्रातील त्यांचा अनुभव लक्षात घेता त्यांनी दिलेला अहवाल मान्य करण्यात यावा.

८.६ त्यानंतर, सदर चौकशी अहवाल मान्य करुन शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविण्यात यावा असे ठरले.

निर्णय : **चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे, चौकशी अधिकारी यांनी श्री. उमेश लुकतुके, तात्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांची चौकशी करुन सादर केलेल्या चौकशी अहवालास मान्यता देत आहे. तसेच सदर चौकशी अहवाल शासनाच्या नगर विकास विभागाकडे पाठविण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : सार्वजनिक उपक्रमांचा अतिरिक्त निधी सिकॉममध्ये गुंतविण्याबाबत.**

९.१ या विषयासंदर्भात महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असे नमूद केले की, शासन निर्णय दिनांक २७.१०.२०१५ अन्वये गुंतवणूकीची कालमर्यादा किमान १ वर्षे व कमाल ३ वर्षे इतकी करण्याबाबत तसेच गुंतवणूकीबाबत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांमधील परिच्छेद १ (क) येथील गुंतवणूकीसाठी पात्र बँका व इतर वित्तीय संस्था यामध्ये सिकॉम लि. यांचे नाव समाविष्ट करण्याचा निर्णय शासन निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दिनांक ०७.०४.२०१६ याव्दारे घेण्यात आला आहे. या शासन निर्णयान्वये सिकॉममध्ये गुंतवणूक करताना अंतर्भूत अटींच्या अधीन राहून गुंतवणूकीचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये प्रामुख्याने नक्तमूल्यांच्या १५% पेक्षा अधिक निधी गुंतवू नये ही अट सिकॉममध्ये गुंतवणूकीसाठी लागू होणार नाही असे शासन निर्णयात नमूद केले आहे. सदर शासन निर्णय प्राधिकरणाच्या गुंतवणूक प्रणालीत समावेश करण्यासाठी कार्यकारी समितीसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. कार्यकारी समितीने शासन निर्णयातील अटी व शर्तींच्या अधीन राहून स्वीकारण्यास मान्यता द्यावी.

**निर्णय :** **वरील शासन निर्णय कार्यकारी समितीने अवलोकन करुन निर्णयातील अटींच्या अधीन राहून पुढील ठराव मंजूर करण्यात आला:-**

**ठराव क्र.१३११ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने सिकॉम लि. यामध्ये दिनांक २७.१०.२०१५ व दिनांक ०७.०४.२०१६ रोजीच्या शसन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे / सूचना व अटींच्या अधीन राहून गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्राधिकरणाच्या अधिनियमांतील कलम ७ (३) (५) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन मुदत ठेवींची कालमर्यादा किमान १ वर्ष व कमाल ३ वर्षे पर्यंत दिनांक २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वे / सूचना यांच्या अधीन राहून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत — सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिव्हर्सिटी जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे या कामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता प्रदान करणेबाबत.**

१०.१ सदर बाब टिप्पणी सादर करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विषयांकित कामास कार्यकारी समितीने दिनांक २१.०७.२०१५ रोजी झालेल्या २४५व्या बैठकीमधील ठराव क्र.१२८४ अन्वये शिफारस केलेल्या रु.४८०.६३ कोटी रक्कमेच्या अंदाजित किंमतीस प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१३४२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली. सदर उन्नत मार्गाची एकूण लांबी ५.२ कि.मी. पैकी ३.८९ कि.मी. (पोच मार्ग धरुन) ची, रुंदी १७.५मी. (२+२ मार्गिका) व उर्वरीत १.१ कि.मी. ची, रुंदी ८.५ मी. (२ मार्गिका) आहे. सदर कामाचा सुसाध्यता अहवाल, अंदाजपत्रक, निविदा मागविणे इ. बाबींसाठी मे.आकार अभिनव कन्सल्टंट प्रा. लि. यांची नेमणूक करण्यात आली. सदर

..२९/-

सल्लागाराने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावाची छाननी केल्यानंतर रु.४१३.२५ कोटी इतक्या अंदाजित किंमतीच्या विषयांकित कामाकरिता एकरकमी पध्दतीची (lump sum) ई-निविदा दिनांक ०९.०५.२०१६ पर्यंत प्राधिकरणाच्या संकेत स्थळावरुन मागविण्यात आली. एकूण २५ निविदाकारांनी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावरुन निविदा प्राप्त केल्या व त्यापैकी ०४ निविदाकारानी ई-निविदेच्या नियमावली प्रमाणे संपूर्ण निविदा भरली. सदर निविदाकारांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

(१) मे.सिम्प्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि.

(२) मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि.

(३) मे.आय.एल.ॲन्ड एफ. एस. इंजिनियरींग ॲन्ड कन्स्ट्रक्शन कं.लि.

(४) मे.एन.सी.सी.लि.

१०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर निविदाकारांचा तांत्रिक गुणवत्ता अहवाल दिनांक २१.०७.२०१६ रोजी अति.महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा मुल्यांकन समिती बैठकीसमोर सादर केला. निविदा मुल्यांकन समितीने सदर बैठकीमध्ये मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेच्या PIL (L)/५१, २०१६ दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या निकालाच्या अनुषंगाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांना मुंबई महानगरपालिकेने दिलेली कामे रद्द केल्याबाबतच्या आदेशानुसार मा.ॲडव्होकेट जनरल (Advocate General), महाराष्ट्र राज्य यांचे मत घ्यावे व तद्नंतर लिफाफा 'क' (Financial bid) उघडावा असा सल्ला दिला. ॲडव्होकेट जनरल, महाराष्ट्र राज्य यांनी पत्र क्र.एजी/२८७/२०१६, दिनांक ०४.०८.२०१६ अन्वये त्यांचे अभिप्राय प्राधिकरणास कळविले व त्या अनुषंगाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचेबाबत योग्य तो निर्णय घेण्याबाबत महानगर आयुक्तांनी खालील बाबींची अतिरीक्त माहिती घेण्याचे मुख्य अभियंता यांना निर्देश दिले:

१०.२.१ मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचेकडून त्यांनी मुंबई महानगरपालिकेमध्ये रस्त्याच्या कामाच्या अनियमीतेबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण तपशील.

१०.२.२ प्राधिकरणाच्या अभियंत्यांकडून मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये आजतागायत केलेल्या कामाबाबतचे अभिप्राय.

१०.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी असे लेखी कळविले की, सदर कंपनी सन १९८० पासून इन्फ्रास्ट्रक्चरची कामे करीत असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वर्ग-१ (अ) मध्ये पंजीकृत आहे. मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. या कंपनीने मागील ३६ वर्षात स्थापत्य वर्गात जसे की, उन्नत मार्ग, उड्डाण पूल, महामार्ग, मेट्रो रेल्वे, रेल्वे वरील उड्डाण पूल, भुयारी मार्ग (Tunnel) अशा प्रकारची महत्वाची कामे शासनासाठी केलेली आहेत. सदर सर्व कामामध्ये मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांची मागील कामगिरी (Track record) चांगली असून सदर सर्व कामे त्यांनी विहीत वेळेत व चांगल्या दर्जामध्ये पुर्ण केलेली आहेत. या कंपनीने आतापर्यंत शासनाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, शहर व औदयोगिक विकास महामंडळ, दिल्ली मेट्रो रेल्वे कोर्पोरेशन, ठाणे महानगरपालिका, ए.एम.सी. व इ.एस.आय.सी. इ. अशा विविध संस्थांमध्ये मोठया प्रमाणात कामे केलेली आहेत. तसेच यापुढे मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी असेही कळविले आहे की, मुंबई महानगरपालिकेमध्ये रस्त्याच्या कामाबाबत सद्य:स्थितीत सुरु असलेल्या कार्यवाहीबाबत दिनांक १६.०५.२०१६ रोजी महानगरपालिकेने त्यांना आढळलेल्या अनियमीततेबाबत 'कारणे दाखवा' नोटीस दिलेली आहे व सदर नोटीसच्या अनुषंगाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचेकडून प्रतीउत्तर देण्यात आले आहे. सदर बाबत सद्य:स्थितीत योग्य ती कार्यवाही मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे आणि याबाबतचा कोणताही अंतिम निर्णय मुंबई महानगरपालिकेकडून घेण्यात आलेला नाही.

१०.४ उपरोक्त मुद्दा क्र.(१०.२.२) बाबत मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये आजतागायत केलेल्या कामाच्या कामगिरीबाबतचा अहवाल प्राधिकरणातील संबंधित अधिक्षक अभियंता यांनी समाधानकारक/चांगला या स्वरुपात दिलेला आहे.

वरील प्राप्त दोन्ही बाबींच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीनुसार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचे लिफाफा 'क' (Financial bid) उघडण्याकरिता खालील बाबींचा एकत्रित विचार करण्यात आला :-

१०.४.१ ॲडव्होकेट जनरल यांनी त्यांच्या पत्रातील परिच्छेद क्र.८.१ मध्ये असे नमूद केले आहे की, मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांच्या कामाबाबतची संपूर्ण माहिती जमा करुन तद्नंतर योग्य तो निर्णय घेऊन लिफाफा 'क' उघडण्याबाबतचे अधिकार प्राधिकरणाला आहेत.

१०.४.२ ॲडव्होकेट जनरल यांनी परिच्छेद क्र.८.३ मध्ये असे नमूद केले आहे की, मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये केलेल्या कामाचा तपशिल सुध्दा समानतेने तपासावा व तद्नंतर त्यांनी मुंबई महानगरपालिकेत व प्राधिकरणातील केलेली कामे याचे मानांकन करण्यास सांगितले आहे.

१०.४.३ ॲडव्होकेट जनरल यांनी परिच्छेद क्र.९.१ मध्ये असे नमूद केले आहे की, प्राधिकरणाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. व इतर ३ कंत्राटदारांना बाद ठरविल्यास अशा प्रकारचा निर्णय हा योग्यता व समानता या संयुक्त कसोटीवर (Twin test) अवलंबून असला पाहिजे असे नमूद केले आहे.

१०.४.४ अंतिमत: ॲडव्होकेट जनरल यांनी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. व इतर ३ कंत्राटदाराबाबत सद्यस्थितीत त्यांच्यावर blanket and omnibus ban टाकता येणार नाही असा सल्ला दिला आहे.

१०.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये आजतागायत १० कामे केली असून कामाच्या संबंधित अधिक्षक अभियंता यांनी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांची कामगिरी चांगली/समाधानकारक असल्याबाबतचा शेरा दिलेला आहे. वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचा लिफाफा 'क' उघडण्यात आला. पात्र ठरलेल्या निविदाकारांचे आर्थिक देकार दिनांक १६.०९.२०१६ रोजी उघडण्यात आले व त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :

| **अ. क्र.** | **निविदाकारांचे नाव** | **आर्थिक देकार रक्कम (रु.कोटी)** | **टक्केवारी** | **शिल्लक असलेली कामे क्षमता (Bid capacity) (रु. कोटीत)** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| १. | मे.सिम्पलेक्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. | ४५७.२ | (+)१०.६४% | ३३९४३.८० | द्वितीय लघुत्तम निविदाकार |
| **२.** | **मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि.** | **४४९.१** | **(+)८.७०%** | **५४३१.०९** | **प्रथम लघुत्तम निविदाकार** |
| ३. | मे.आय.एल.ॲन्ड एफ.एस. इंजिनिअरींग ॲन्ड कन्स्ट्रक्शन कं.लि. | ४७९.५ | (+)१६.०३% | १५९९७.०० | चतुर्थ लघुत्तम निविदाकार |
| ४. | मे.एन.सी.सी.लि. | ४६५.२ | (+)१२.५७% | ३६७६२.९९ | तृतीय लघुत्तम निविदाकार |

१०.६ प्राप्त देकारात मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचा रु.४४९.१ इतक्या किंमतीचा आर्थिक देकार निविदेमध्ये नमूद केलेल्या अंदाजित किंमतीच्या दराने (+) ८.७०% जास्त असलेल्या प्रथम निविदाकार होता. सदर आर्थिक देकार हा कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा जास्त असल्याने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांच्याकडून प्राधिकरणाच्या दिनांक १६.०९.२०१६ रोजीच्या प्रत्रान्वये स्पष्टीकरण मागविण्यात आले. मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी सदर बाबत खालीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले :-

१०.६.१ सदर कामासाठी निविदेच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदार स्वत:चे डिझाइन व संकल्प चित्रांचा वापर करणार आहे.

१०.६.२ प्रस्तावित प्रकल्प मुंबईच्या अतिशय महत्वाच्या व प्रचंड वर्दळीच्या ठिकाणी असल्याने प्रकल्प हा विहित वेळेत पूर्ण करण्याच्या अनुषंगाने अतिरिक्त साधने व मनुष्यबळाची निकड लागणार आहे.

१०.६.३ सदर कामाची अंदाजित रक्कम ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुंबई विभागाच्या डीएसआरचे दर वापरुन काढण्यात आलेली आहे व डिएसआरमध्ये वरील अतिरीक्त वरकड खर्चाच्या बाबी विचारात घेतल्या जात नाही.

१०.७ या अनुषंगाने सदर कामाच्या प्रकल्प सल्लागाराने लघुत्तम निविदाकाराने दिलेल्या कारणांचा विचार करुन लघुत्तम निविदेतील देकाराची किंमत ही अंदाजपत्रकाच्या किंमतीच्या जवळपास असून ती स्विकारण्यास योग्य असल्याची शिफारस केली आहे.

१०.८ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी श्री. अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत सदर कंत्राटदाराबाबत सुरु असलेली कार्यवाही समजून घेतली. श्री. अजोय मेहता यांनी सद्यस्थितीत मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. व इतर तीन कंत्राटदारांवर सुरु असलेल्या कारवाईबाबत कार्यकारी समितीला अवगत केले. चर्चेच्या दरम्यान श्री.अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असेही सांगितले की, प्रस्तृत प्रकरणी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. व इतर तीन कंत्राटदारांनी मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये अपिल केले आहे व त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सुरु आहे, तसेच मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. इतर कंत्राटदारांवर मुंबई महानगरपालिकेमध्ये कामाच्या अनियमितेबाबत आढळून आलेल्या प्रकाराबाबत सद्य:स्थितीत कारवाई सुरु असून आजतागायत अंतिम निर्णय झालेला नाही.

१०.९ कार्यकारी समितीचे सदस्य श्री. नितीन करीर, प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी निविदेतील अट क्र. ३७.१.२ मधील तरतूदीनुसार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांची पात्रता तपासावी असे सुचविले. याबाबत महानगर आयुक्तांनी ॲडव्होकेट जनरल यांनी दिलेल्या मताच्या अनुषंगाने मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये आतापर्यंत केलेल्या कामाचा आढावा संबंधित अधिक्षक अभियंता यांचेकडून घेण्यात आला असे सांगितले व त्यानुसार मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांची प्राधिकरणामधील आजतागायतची कामगिरी समाधानकारक / चांगली आहे असे स्पष्ट केले.

१०.१० कार्यकारी समितीचे सदस्य श्री.अजोय मेहता, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व कार्यकारी समितीचे निमंत्रित सदस्य श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांनी सदर कामावर अतिरीक्त दक्षतेच्या (Extra vigilance) दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी असे सुचविले. याबाबत प्राधिकरणामार्फत सदर कामाच्या देखरेखीसाठी स्वतंत्र प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांची नेमणूक करण्यात येणार असून या व्यतिरिक्त सदर कामास तृतीय पक्ष सल्लागार (Third Party Consultant) नेमण्याचे प्रयोजन असल्याचे सांगितले.

१०.११ मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांनी प्राधिकरणामध्ये आजतागायत केलेल्या कामाच्या संबधित अधिक्षक अभियंता यांनी दिलेल्या माहितीची खात्री संबंधित अधिक्षक अभियंत्यांना सदर बैठकीमध्ये व्यक्तीश: बोलावून करुन घेतली. प्राधिकरणाकडे मे. जे.कुमार यांनी यापूर्वी केलेल्या कामाची प्रतवारी तपासून घ्यावी असे निर्देश देखील मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिले.

वरील सर्व बाबींचा विचार करुन चर्चेअंती कार्यकारी समितीने मे.जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांचा लघुत्तम आर्थिक देकार स्विकारण्याचे मान्य केले.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**ठराव क्र.१३१२ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३ ) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि त्याबाबत त्यास सहाययभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समितीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत "सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिर्व्हसिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पूलाला जोडणारा उन्न्त मार्ग बांधणे व एम.टी.एन.एल. जंक्शन, बीकेसी ते लाल बहादूर शास्त्री मार्ग उड्डाणपुलास जोडणारा उन्नत मार्ग बांधणे या कामांच्या मे.जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. यांच्या रु.४४९.१ कोटी म्हणजेच निविदेमध्ये नमूद केलेल्या रु.४१३.२५ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा (+) ८.७०% जास्त किंमतीच्या अंतिम आर्थिक देकारास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलांसह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत — सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिर्व्हसिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळून मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे या कामासाठी सल्लागाराची नेमणूक करणेबाबत.**

११.१ सदर बाब टिप्पणी सादर करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असलेल्या विषयांकित कामास कार्यकारी समितीने दिनांक २१.०७.२०१५ रोजी झालेल्या २४५व्या बैठकीमधील ठराव क्र.१२८४ अन्वये शिफारस केलेल्या रु.४८०.६३ कोटी रक्कमेच्या अंदाजित किंमतीस प्राधिकरणाने त्यांच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१३४२ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली. सदर उन्नत मार्गाची एकूण लांबी ५.२ कि.मी. पैकी ३.८९ कि.मी. (पोच मार्ग धरुन) ची, रुंदी १७.५ मी. (२+२ मार्गिका) व उर्वरीत १.१ कि.मी. ची, रुंदी ८.५ मी. (२ मार्गिका) आहे.

११.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अंदाजित खर्चाच्या किंमतीमध्ये २% इतका खर्च म्हणजेच रु.७.८८ कोटी किंमतीस प्रकल्प व्यवस्थापक सल्लागांराची नेमणूक करण्याबाबात मान्यता दिलेली आहे. सदर कामासाठी प्रकल्प सल्लागार

नेमणूकीकरीता एकरकमी पध्दतीची (lump sum) ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर दिनांक ०९.०५.२०१६ तसेच मराठी दैनिक 'नवाकाळ' इंग्रजी दैनिक 'मिड-डे' या वर्तमानपत्रात दिनांक ०४.०५.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली. १७ इच्छुकांनी प्राधिकरणाच्या संकेत स्थळावरुन ई-निविदा प्राप्त केल्या व त्यापैकी ५ सल्लागारांनी ई-निविदेची प्रक्रिया परिपूर्ण केली, त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

१. मे.लुईस बर्जर
२. मे. एस.एन.भोबे असोसिएटस प्रा.लि.
३. मे.पॅडेको कं.लि.
४. मे. राईटस लि.
५. मे.स्टुप कन्सल्टंटस प्रा.लि.

११.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सविस्तर निविदा सुचनेमध्ये विहित केल्याप्रमाणे पात्रता निकषास अनुसरुन ई- लिफाफा 'अ' व 'ब' मध्ये निविदाकाराने सादर केल्याप्रमाणे छाननी करण्यात आली. पात्रता निकषानुसार अटी पूर्ण न केल्यामुळे मे. एस.एन. भोबे असोसिएटस व मे. राईटस लि. या दोन सल्लागारांना बाद ठरविण्यात आले. उर्वरीत तीन पात्र सल्लागारांचे लिफाफे ‘क’ उघडण्यात आले त्याची स्थिती खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | तांत्रिक मुल्यमापन | | | आर्थिक मुल्यमापन | | | एकत्रित गुण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तांत्रिक गुण | मुल्यांकित गुण (८०% प्रमाणे) | तांत्रिक क्रमांक | आर्थिक देकार (रु. कोटी) | आर्थिक गुण | मुल्यांकित गुण (२०% प्रमाणे) | तांत्रिक + आर्थिक | क्रमांक |
| १. | मे.लुईस बर्जर | ९५.०७ | ७६.०६ | द्वितीय | १०.२८ | ५९.२८ | ११.८६ | ८७.९१ | द्वितीय |
| २. | मे. एस.एन.भोबे असोसिएटस प्रा.लि. | निविदेतील अट क्र. ४ (ii) क प्रमाणे बाद ठरविण्यात आले आहे. | | | | | | | |
| ३. | मे.पॅडेको कं.लि. | ९४.४८ | ७५.५८ | तृतीय | ६.१० | १००.० | २०.०० | **९५.५८** | **प्रथम** |
| ४. | मे. राईटस लि. | निविदेतील अट क्र. ४ (v) क प्रमाणे बाद ठरविण्यात आले आहे. | | | | | | | |
| ५. | मे.स्टुप कन्सल्टंटस प्रा.लि. | ९५.१४ | ७६.११ | प्रथम | ९.६३ | ६३.३५ | १२.६७ | ८८.७८ | तृतीय |

११.४ प्राप्त देकारात सल्लागार मे.पॅडेको कं.लि. यांचा रु. ६.१० कोटी इतक्या किंमतीचा आर्थिक देकार निविदेच्या अंदाजित किंमतीच्या १.४७६% असलेला प्रथम देकार आहे. तसेच मे.पॅडेको कं. लि. यांनी आर्थिक व तांत्रिक एकत्रित मुल्यांकनाच्या क्रमवारीत प्रथम क्रमांक मिळविला व त्यामुळे मे. पॅडेको कं.लि. यांचा लघुत्तम देकार प्राधिकरणाच्या निविदा समितीने मान्य केला.

११.५ चर्चेअंती, कार्यकारी समितीने मे. पॅडेको कं.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता दिली.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३१३ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांच्या वापर करुन कार्यकारी समिती मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सांताक्रुझ चेंबूर जोडरस्त्यामध्ये वाकोला जंक्शन, आंबेडकर चौक, युनिव्हर्सिटी जंक्शन व बीकेसी जंक्शन मिळुन मिठी नदी ते वाकोला पुलाला जोडणारा उन्नत मार्ग बांधणे व एम.टी.एन.एल. जंक्शन, बीकेसी ते लाल बहादूर शास्त्री मार्ग उड्डाणपुलास जोडणारा उन्नत मार्ग बांधणे या कामांच्या सल्लागार, मे. पॅडेको कं.लि., यांच्या लघुत्तम निविदेस रु.६.१० कोटी म्हणजेच निविदेच्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या १.४७६% इतका आर्थिक देकार होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********